॥ श्री ॥

संघर्ष (कथा) ①

मध्यंतरी पुण्यात एका सांस्कृतिक कार्यक्रमात मी कथाकथन करण्यासाठी गेले होते. कार्यक्रमानंतर जेवणाचेही आयोजन होते. खरंतर मला बाहेर काही खाल्लं की त्रासच व्हायचा. मी त्यांना जेवणाचे राहू द्या असेही म्हणाले. परंतु त्यांनी वारंवार आग्रह केल्याने माझाही नाईलाज झाला. मग तिथेच थोडा फेरफटका मारताना मला 'ती' दिसली. तेच तेजस्वी डोळे, कणखर आवाज परंतु पूर्णपणे कायापालट झालेली अतिशय कृश झालेली माझी बालमैत्रिण संध्या. कार्यक्रमाच्या जेवणाची व्यवस्था तीच पहात होती. तिच्या कणखर आवाजामुळेच माझं लक्ष तिच्याकडे गेलं.

"संध्या ना तू" असं विचारताच क्षणभर गोंधळली ती. "ओळखलंस मला". कशी ओळखणार अखेर तीस वर्षांनी आम्ही भेटत होतो. माझ्या शरीरावर लग्नानंतरची सुखवस्तुपणाची सर्व लक्षणं पसरली होती. तिने नकारार्थी मान डोलावली. "अगं मी राणी तुझी बालमैत्रिण". मी असं म्हणताच तिच्या नजरेत ओळख दिसली आणि तिने मला कडकडून मिठी मारली. आमच्या दोघींच्या ~~नजरेतून~~ डोळ्यांतून गंगा-यमुना वाहू लागल्या. आसपासचे लोक आमच्याकडे आश्चर्याने पहात आहेत हे लक्षात येताच आम्ही दोघींनी डोळे पुसले. आयोजकांनी मला विचारले, "आपण ओळखता का एकमेकींना?" मी हसून त्यांना सांगितले, "अहो ही माझी बालमैत्रिण संध्या". मग आयोजकांनी सांगितले, "ह्या सौ. संध्या जोशी पुण्यातील नामवंत केटरर". थोडफार बोलून आम्ही दोघींनी एकमेकींचे मो. नं. घेतले आणि येत्या रविवारी बालगंधर्वला भेटायचे ठरवले. घरी आल्यावर पण संध्याची कृश मूर्ती माझ्या नजरेसमोरून जात नव्हती.

लहानपणी संध्या आणि मी एकाच कॉलनीत रहायचो. एकाच शाळेत शिकलो. अगदी खास मैत्रिणी. पुढे कॉलेजला गेल्यावर मात्र मी आर्ट्स आणि ती सायन्स साईड घेतल्याने भेटीगाठी कमी होऊ लागल्या. त्यातून वडिलांनी दूर

संघर्ष .... (2)

गावाबाहेर बंगला बांधल्याने खूपच कमी भेटणे व्हायचे. संध्या पहिलेपासूनच स्वाभिमानी, हुशार होती. स्वतःच्या मतांवर ठाम असायची. रंगाने गहुवर्णी, तेजस्वी पाणीदार टपोरे डोळे, कुरळे केस कुणीही प्रेमात पडावे अशी होती. तिच्या घरची परिस्थिती साधारणच होती. आमच्या दोघींची मात्र खूप गट्टी होती. माझे लग्न विसाव्या वर्षीच झाले. तिचे थोडे उशीराच झाले. तिने बी.एस.सी. करून पुढे बी.फार्म केले. अधूनमधून माहेरी आले की तिच्याविषयी कळायचे. मी लग्न होऊन मध्यप्रदेशात गेल्याने तिची माझी भेट झालीच नाही. त्याकाळी फोन वगैरे नसायचे. पण इकडून तिकडून खुशाली कळायची. विचार करता करता केव्हा डोळा लागला कळलेच नाही.

रविवारी संध्याकाळी मी तिला भेटायला गेले. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा मारून अखेर मी माझ्या मनात डाचत असलेला प्रश्न तिला विचारलाच, "संध्या एक विचारू तुला वाईट तर नाही वाटणार?" "विचार गं मला माहित आहे तू काय विचारणार आहे. माझी ही अवस्था पाहून तुला बरेच प्रश्न पडले असतील ना? पण तू काळजी करू नकोस. मी बरी आहे गं." असं म्हणत असतांना तिच्या डोळ्यातील पाणी ती लपवू शकली नाही. मी तिला अगदी गळं घातली तेव्हां तिने मला जे सांगितले ते ऐकून मला थोडेसे वाईट वाटले. पण त्याहिपेक्षा तिच्या जगण्याच्या धडपडीचं कौतुक जास्त वाटलं त्याचप्रमाणे तिची स्वतःची स्वप्नं साकारण्याची धडपड फार अभिमानास्पद वाटली.

संध्याचं लग्न एका श्रीमंत मुलाशी झालं होतं. त्याने तिला मागणीच घातली होती. सासूसासऱ्यांनाही ती पसंत होती. संध्याच्या आईवडिलांना राजेश आवडला होता. उंच सावळा [illegible] एक इंजिनिअर मुलगा. आणखी काय हवं त्यातून संध्याला धाकट्या दोघी बहिणीच होत्या. घरची परिस्थिती सुमारच होती. वडिल शिक्षक होते आई प्रायमरी शाळेत शिक्षिका होती. त्यात तिघी मुलीच असल्याने ती

काटकसरीने संसाराच्या गाडा चालवत होती. संध्याचे लग्न श्रीमंत घरात करणे कसं जमेल या चिंतेत दोघेही होते. परंतु सासरचे लोक चांगले असल्याने फक्त 'मुलगी आणि नारळ' द्या असे सांगून. दोन्हीकडून लग्न करून घेतले होते. पहिले पांच, सात वर्षे सर्वकाही सुरळीत सुरू होते. तिला दोन मुली झाल्या. दृष्ट लागेल असा संसार सुरू होता. पण...

अखेर नियतीच्या मनात काय असते ते आपल्याला कधीच कळत नसते. राजेशने अचानक नोकरी सोडून बिझीनेस करण्याचा निर्णय घेतला. सासूसासरे पण हो म्हणाले परंतु दुर्दैवाने राजेशच्या भोळ्या स्वभावाचा गैरफायदा त्याच्या भागीदारांनी आणि मित्रांनी घेतला. त्यांनी राजेशला चांगलेच गोत्यात आणले. या सर्व परिस्थितीमुळे रहाते घर गाडी सोनेनाणे सर्व काही विकावे लागले. सासूसासऱ्यांनी तर हाय खाऊन अंथरुणच धरले. वर्षभरातच दोघे गेले. मग खरी संध्याची जगण्यासाठीची धडपड सुरू झाली. इकडे राजेशही पार निराशेच्या गर्तेत बुडाला. दिवसेंदिवस घरात काही न करता बसून रहायचा. संध्याने त्याला हिंमत देण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ. त्यानंतर त्याच्या मनाने उभारी कधीच धरलीच नाही. काही नाही तर ~~समाज~~ समाजसेवा तरी कर मन रमव असही त्याला सांगून पाहिलं. परंतु तो नंतर दारूच्या व्यसनात लागला. घरी येऊन मुलींना मारहाण कर संध्याला शिवीगाळ करायचा. घरी येऊन लोक उधारी मागायचे मग घरातली भांडीकुंडी विकून, अंगावरील किडुकमिडुक विकून तिने लोकांची उधारी चुकवली आणि ती कोल्हापूरला आली.

बी. फार्म. असल्याने काही मेडिकल स्टोर्सवाल्यांनी तिचे नाव वापरून नफ्यात 20% भागीदारी देऊ केली. फावल्या वेळात ती ट्युशन्स करून कसाबसा घरखर्च भागवू लागली पण दैवाला तेही मान्य नव्हते. तिथेही तिच्या नवऱ्याने बऱ्याच लोकांकडून पैसे घेतले. ते तिला त्रास देत होते. मुलींचे शिक्षण सुरू होतच. धाकट्या मुलीला शिक्षणात फारशी रुचि नसल्याने 12 वी नंतर तिचे लग्न करून दिले. मोठी मुलगी मात्र खूप

हुशार असल्याने इंजिनिअर झाली. त्यावेळी नातेवाईकांनी पण थोडीफार मदत केली. पण नवऱ्याची मात्र कणभरही साथ नव्हती. मुलगी नोकरीला लागल्यावर तिची परिस्थिती थोडी सुधारली. मग संध्याने घरपोच डबे द्यायला सुरुवात केली. हाताला चव असल्याने तो धंदा चांगलाच जमू लागला. चार पैसे गाठीशी जमवून तिने दोन रूम किचनचा एक फ्लॅट घेतला. मोठ्या मुलीचे लग्न केले. दोन्ही लग्नात एकच गोष्ट जमेची होती की, मुलवाल्यांनी काहीच मागितले नाही. संध्याच्या ओळखी वाढू लागल्या. मग कुणीतरी तिला पुण्याला जायचा सल्ला दिला. पुण्यात तिने दोन बायका हाताशी धरून सुरुवातीला १५-२० लोकांच्या जेवणाच्या ऑर्डर घ्यायला सुरुवात केली. आता तिचे छान सुरू होते. मध्यंतरीच्या काळात तिने राजेशला पण व्यसनमुक्ती केंद्रात पाठवून त्याला ताळ्यावर आणले. आता तो पण तिला डबे पोचवण्याच्या कामात मदत करतो. मोठी मुलगी आणि जावई चांगले आहेत. ते तिला आता काम नको करू असे म्हणतात पण ती स्वाभिमानी असल्याने तिला पटत नाही. पडत्या काळात ज्या नातेवाईकांनी तिला मदत केली होती. त्या सर्वांचे पैसे तिने परत केले. मी पण तिला म्हणाले, "स्वस्थ आता तू थकली आहेस आराम कर." पण ऐकेल ती संध्या कसली. ती म्हणाली, 'आता ती तिचे स्वप्न पुरं करण्यासाठी काम करत आहे.' मी तिला आश्चर्याने विचारलं, "आता काय स्वप्न आहे तुझं? आणि हे काय वय आहे का आता साठी जवळ आली तुझी" त्यावर ती हसून म्हणाली,

"अगं आता कुठे तर मी माझ्यासाठी जगू शकते. इतकी वर्षे हाता-तोंडाची गाठ घालून देण्यासाठी वावरले. आता मी माझं स्वप्न पुरं करणार." मी पण तिच्या स्वप्नाविषयी जाणून घ्यायला उत्सुक होतेच. "मग आता काय चालली आहे तुझी खटपट" मी तिला विचारले. ती म्हणाली, "अगं मी पै-पै वाचवून पाच सहा वर्षांपूर्वी कोकणात डोंगराळची पडित जमीन विकत घेतली. तिथे काजूची झाडं लावली आहेत.

(७)

मागच्या वर्षी पहिल्यांदा काजू आले" मला आश्चर्य वाटलं.

"काय? संध्या तुला वेडबिड लागलंय का? अगं किती मेहनत असते त्यात. त्यातून तुला नवऱ्याची अजिबात साथ नाही. कमाल करतेस. कसं जमवते हे सगळं." ती म्हणाली.

"मेहनत तर खूप आहे पण त्यामागे सुद्धा एक कारण आहे. तुला आठवतं, आपली एक श्रीमंत मैत्रिण होती. ती शाळेत येतांना फ्रॉकच्या खिशात काजू बदाम भरून आणायची. ती कधीकधी तिची मर्जी असली तर एखादा काजू आपल्याला खायला द्यायची. मला खूप आवडायचे काजू. आईला मी काजू आणायला सांगायची पण परिस्थितीमुळे तीही लाचार होती. कधी नातेवाईकांकडे काचेच्या बरणीत ठेवलेले काजू मला खुणवायचे. आईला तर मी नेहमी म्हणायची मला नवीन फ्रॉक नको मला काजू आणून दे. त्यावर ती गंमतीने मला म्हणायची तुझ्यासाठी आपण काजूचा व्यापार करणारा नवरा शोधू. पण कसंच काय लग्नानंतर चार पांच वर्षे सुबत्ता असल्याने काजू खायला मिळाले पण नंतर सर्व फासेच पालटले. आणि परत ठोकरा जे माझ्या नशिबात लहानपणी घडलं तेच माझ्या मुलींना सोसावे लागले. माझ्या लहान मुलीला काजूच फार वेड होतं. तेव्हांच मी मनात ठरवलं होतं; एक ना एक दिवस मी जरूर काजूची शेती करेन. आता माझ्या नातीला पण काजू खूप आवडतात. आज ती मागते तेव्हा मुठभर का होईना मी तिच्या हातावर काजू ठेवू शकते. यातच मला समाधान आहे" हे सांगताना तिचे डोळे विलक्षण चमकत होते. मी तिला विचारलं,


"हे सर्व तू कसं केलंस? नक्की तू लहानपणापासून जिद्दी आहे पण सोपं नाही गं सर्व" ती म्हणाली,

"सोपं तर नव्हतंच गं. मला कोकणात डोंगरावरची खडकाळ जमीन कमी भावात मिळाली. मी आणि माझी लहान मुलगी आम्ही दोघी तिथे गेलो. तेथील लोकांनी आम्ही बाईमाणूस पाहून सुरुवातीला खूप त्रास दिला. जमीन खणण्यासाठी मजूर आवश्यक होते पण तेवढी सोय माझ्याकडे नव्हती

(६)

हयांनी नेहमीप्रमाणे हात वर केले. अखेर दोन मजूर खणण्यासाठी लावले आणि माती टाक वाहण्याचे काम आम्ही दोघी मायलेकींनी केले. खूप थकून जायचो. शहराची ओढ असल्याने कोल्हापूरहून रोज ८० कि.मी. दूर गावी जायचो. संध्याकाळी परत यायचो. कोकण मुलीच्या सासरच्यांनी पण जिला हे सर्व करण्याची परवानगी दिली हे विशेष. अखेर आमची चिकाटी पाहून गावातील लोकांनी पण आम्हाला मदत केली. मग आम्हालाही खूप हुरूप आला. पांच वर्षं खूप मेहनत केली तेव्हा आता फळ हाताला लागले. यावर्षी काजू खूप लागले पण त्यांना साफ करणं खूप किचकट काम असतं. पण आता नवरा थोडीफार मदत करतो. पण पैशांचे व्यवहार मी त्याच्या हातात देत नाही. मागच्या वर्षी पण काजू लागले होते. पण दुर्दैवाने माझ्या आईची प्रकृती बिघडल्याने शेतीकडे दुर्लक्ष झाले. गाववाल्यांनी त्याचा फायदा घेऊन काजू पळवले. पण यावर्षी मी जातीने लक्ष घालून उत्पादन वाढवले. आता आम्ही दोघेही तिथेच असतो. मला कॅटरिंगची मोठी ऑर्डर मिळाली की मी पुण्याला येते. त्यावेळी नवरा तिथेच राहून काजूची देखभाल करतो. आज माझ्या काजूला खूप मागणी आहे. माझे काजू सर्व देशभरात आणि परदेशात जावे हेच माझे स्वप्न आहे. आता मी कोकणच्या हापूस आंबा पण छोट्या मोठ्या प्रमाणावर पाठवते. आता आणखी एक जमिनीचा तुकडा लवकरच विकत घेईन तिथे काजू लावीन." तिचे हे बोलणे ऐकताना मी धन्य झाले. न राहवून मी तिला घट्ट मिठी मारली. तिने माझ्यासाठी काजू आणले होते. घरी आल्यावर मी काजू खाऊन पाहिले. त्या काजूंची चव सर्व जगातील काजूंपेक्षा वेगळीच होती. वयाची साठी जवळ आली असून तिच्यातील आत्मविश्वास पाहून मी नतमस्तक झाले.

लेखिका- सौ. ऐश्वर्या डगांवकर
इंदोर / पुणे
मो. नं. 9329136615



व्हिडिओ पहा